# हिनयान बौध्द धर्म

बुध्दांच्या महापरिनिर्वाणानंतर काही वर्षातच विविध विचारप्रवाह निर्माण होऊ लागले. यांना आपण पंथ असे म्हणू शकू. बुध्दांनी जे विचार मांडले त्यांचा विविधप्रकारे अर्थ लावला जाऊ लागला. अशा एकूण १८ विचारधारा होत्या असे आपल्याला समजते. यातील. सुरुवातीची परंपरा म्हणजे 'स्थविरवाद' किंवा थेरवाद' होय. या थेरवादालाच, "निकाय' असे म्हणले जाते. तसेच, महायानपंथीय लोक, या पंथाला 'हिनयानपथ' असे ओळखतात.

यांच्या विचारानुसार, गौतम बुध्द हे एक मानव होते; आणि त्यांनी, त्यांच्या प्रयत्नाने निर्वाणपद प्राप्त केलेले आहे. म्हणजेच हे बुध्दांना अवतारी, चमत्कारी, देव वगैरे मानत नाहीत, तर ते, त्यांना मनुष्य समजतात. दुसरे असे की, ज्याप्रमाणे बुध्दांनी प्रयत्नांनी निर्वाणपद प्राप्त केले त्याचप्रमाणे आपणही प्रयत्न केले तर आपल्यालाही बुद्धत्व प्राप्त होऊ शकते. म्हणून, असे अर्हतपद प्राप्त करण्यासाठी सतत प्रयत्न करीत राहिले पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे.

यांनी 'संन्यासा'ला अधिक महत्व दिलेले आहे. आणि संन्यस्त भिक्षूंनी, सातत्याने प्रयत्नशील राहून, स्वतःचा उध्दार करुन घ्यायचा आहे, असे ते म्हणतात. यांचा फक्त बुध्दावर विश्वास आहे. आणि ते, बुध्दांच्या मूळ शिकवणूकीशी अगदी प्रामाणिक असतात.त्यांना बुध्दवचनात कोणतेही फरक मान्य नाहीत. तसेच, बुध्दवचनांचा, इतरांनी लावलेला अन्वयार्थ किवा स्पष्टीकरणही अमान्य आहे.यांनी जसे बुध्दांच्या मूळ शिकवणूकीवर भर दिला. त्याचप्रमाणे फक्त पाली भाषेतच लेखन केले.तसेच, ते बुध्दांप्रमाणेच मूर्तीपूजेच्या विरोधी आहेत. बुध्दांच्या मूर्ती ऐवजी त्यांच्या प्रतिकांना ते महत्व देतात. जसे, स्तूप, कमळ, हत्ती, पाऊल, चक्र इत्यादी. शिवाय, या प्रतिकांचे ते पारंपारिक अर्थाने पूजनही करत नाहीत, कोणत्याही कर्मकांडाला ते थारा देत नाहीत, तर बुध्दांच्या प्रतिकासमोर ध्यान लावणे हीच यांची पूजनपध्दती आहे.

अशा या हिनयानपंथाचा भारताबरोबरच अन्य देशांतही प्रसार झालेला आहे. विशेषतः श्रीलंका, ब्रह्मदेश, कंबोडिया या देशांत मोठा प्रसार झालेला दिसून येतो.या हिनयानांचे वैभवशाली धार्मिक स्थापत्य या काळात तयार झाले. विशेषतः सातवाहनांच्या काळ सह्याद्रीची डोंगररांग आणि तिच्या उपशाखांमध्ये कित्येक गुहास्थापत्य निर्माण झाले. यामध्ये चैत्य दिसून येतात हे बुध्दांचे प्रार्थनास्थळ असते. तसेच, विहार दिसून येतात. हे भिक्षूंच्या निवासासाठी खोदले गेलेले असते. उसे अनेक चैत्य-विहार महाराष्ट्रात दिसून येतात. 'भाजे' या ठिकाणी या स्थापत्याचा प्रारंभ झाला. पुढे कार्ले, भाजे, बेडसा, औरंगाबाद, नाशिक, जुन्नर अशा विविध ठिकाणी आपल्याला या लेण्या दिसून येतात. याठिकाणी अन्य शिल्प जरी दिसत असली तरी बुध्दांची मात्र मूर्ती दिसून येत नाही. तर चैत्यामध्ये फक्त स्तूपाची दगडी प्रतिकृती दिसून येते. आंध्र प्रदेशातील अमरावती शैलीतील शिल्पांमध्येही बुध्दांची मूर्ती दिसून येत नाही तर बुध्दाच्या प्रतिकांचे पूजन करणारे भक्तगण दिसून येतात. हीच कथा मध्य प्रदेशातील स्तूपाची. येथील साची आणि भारहूत स्तूपांच्या तोरणांवर बुध्दांचे फक्त प्रतिमात्मक अंकन आहे.हे स्थापत्य निर्माण होणे ही प्रचंड खर्चाची बाब असे. यासाठी या काळातील राजे आणि धनाढ्य श्रेणींच्या आर्थिक मदतीतून या लेण्या निर्माण झालेल्या आहेत. पुढे भारत आणि रोमन व्यापार डळमळीत झाला. याचा प्रतिकूल परिणाम एकंदर परिस्थितीवर झाला. येथील राजे, पूर्वेकडे आंध्र प्रदेशात निघून गेले. तर श्रेण्या आर्थिकदृष्ट्या ढासळल्या. मात्र हीनयानाचे धार्मिक स्थापत्य अशा परिस्थितीतही निर्माण होत होते. अर्थात पूर्वीसारखे शिल्पांनी सजलेले वैभवशाली स्थापत्य तयार होणे हे अशक्य होते. त्यामुळे, साध्या स्वरुपाचे स्थापत्य या काळात दिसू लागते. ढवळीकर अशा स्थापत्यांना 'उत्तर हिनयानकालीन स्थापत्य' असे म्हणतात. असे चैत्य- बिहार आपल्याला कोल्हापूरजवळील पोहळे, पाडवदरा, कऱ्हाडजवळील जाखीणवाडी, आगाशीय; वाईजवळ पालकेश्वर इ. ठिकाणी दिसून येतात.

सारांश:

मौर्याच्या हासानंतर, भारतभर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. विविध राज्यांमध्ये संघर्ष होत होता... त्यात परकियांची आक्रमणं होत होती. अशा काळात नर्मदेच्या उत्तरेकडे कुशाणानी तर दक्षिणेकडे सातवाहनांनी राज्य निर्माण केले. हे राज्य आपल्या एकछत्री, एकसंधी प्रशासनाने उत्तम राखले. परिणामी भारतात दीर्घकालीन स्थैर्य आणि शांतता प्रस्थापित झाली. यातून शेती उद्योग विकसित झालेच. शिवाय आंतरराष्ट्रीय व्यापाराने कळस गाठला. आर्थिक समृध्दी निर्माण झाली. या समृध्दीतून कला-स्थापत्यात उत्तम प्रगती झाली. हीनयानांच्या प्रभावाखालील बौध्दगुहा स्थापत्यं आणि स्थानिक मथुराशैलीचा उदय हे याचे उदाहरण.